रायगड जिल्ह्याच्या प्रादेशिक नियोजनाचा भौगोलिक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यशास्त्र विद्याशाखेतील भूगोल विषयाच्या पीएच.डी.

(विद्यावाचस्पती) पदवीकरिता सादर करावयाचा प्रबंध आराखडा

संशोधक

बाबासाहेब मोहनराव कांबळे

(एम.ए.एम.फिल, भूगोल)

मार्गदर्शक

डॉ.सदानंद हरिबा गोने

प्राचार्य,

उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणसी

ता.जळकोट जि.लातूर

संशोधन केंद्र

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

डिसेंबर २०१७

१.१ प्रस्तावना :

प्रादेशिक नियोजन ही मानवी भूगोलाची शाखा आहे. प्रादेशिक नियोजनाचा समावेश आर्थिक भूगोलाच्या अनूषंगाने देखील केला जातो. कोणत्याही प्रदेशाचे नियोजन हे किती प्रमाणात झाले हे ओळखायचे असल्यास त्या प्रदेशातील भौतिक सुविधांचा आणि मानवी विकास दर या बाबीचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

आधुनिक काळामध्ये कोणत्याही राष्ट्राला जर विकास साधायचा असेल तर त्यासाठी प्रादेशिक नियोजन ही काळाची गरज असून शाश्वत विकास साधायचा असल्यास प्रादेशीक नियोजन हे महत्वाचे आहे. भारतासारख्या विकसनशील देशाला प्रामुख्याने प्रादेशिक नियोजनाची प्रकर्षाने गरज आहे. कारण आजही देशातील अनेक राज्ये प्रादेशिक असमतोलाला सामोरे जात आहेत. देशाला संपूर्ण समतोल राखायचा असल्यास प्रादेशिक नियोजन खुपच गरजेचे आहे. संपुर्ण जगामध्ये आज भारताची लोकसंख्या अधिक असून देशाला मोठ्या प्रमाणात लोकसंख्येच्या समस्या भेडसावत आहेत. यामुळेच देशाला महासत्ता बनवायचे असल्यास प्रादेशिक नियोजन खूप महत्वाचे आहे.

भारत देश हा कृषीप्रधान देश असून भारतात आजही शहरांच्या मानाने खेड्यांची संख्या खूप अधिक आहे. आजही प्रत्येक खेड्यांमध्ये दळणवळणाची पूर्ण साधने उपलब्ध झालेली नाहीत. पिण्याच्या पाण्यासाठी लोकांना ५ ते १० कि.मी पर्यंत पायी प्रवास करावा लागतो. शासकीय योजना देखील पुर्णपणे राबवण्यात आपण अयशस्वी ठरलो आहोत. यामुळेच देशामध्ये आज मोठ्या प्रमाणात नियोजनाची गरज आहे व हे नियोजन अत्यंत सुक्ष्म स्तरापासून म्हणजे तालूका स्तरावरुन जिल्हा व नंतर राज्य, देश असे व्हावयास हवे कारण भारत हा क्षेत्रफळाच्या मानाने विस्तृत असा देश असून लोकसंख्येच्या मानाने तो दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. योजना, त्याचे क्षेत्र, प्रदेश विकास या सर्व गोष्टीचे योग्य नियोजन न झाल्यास देशाचा आर्थिक विकासाचा डोलारा बिघडू शकतो. यामुळे प्रस्तुत रायगड जिल्ह्याच्या विकासाच्या प्रादेशिक नियोजनाच्या अभ्यास या बाबींचा आढावा घेण्याचा प्रयत्न करणार आहे.

१.२ अभ्यास क्षेत्र :

भारतातील महाराष्ट्र राज्य एक महत्त्वाचे राज्य असून महाराष्ट्राच्या पश्चिमेला कोकण किनारपट्टीत अरबी समुद्रालगत असणारा आजचा रायगड जिल्हा म्हणजेच पुर्वीचा कुलाबा जिल्हा होय. रायगड जिल्ह्याला लाभलेले भौगोलिक स्थान हे अतिशय महत्त्वाचे असून रायगड जिल्हा पूर्वेस सह्याद्री पर्वतरांग व पश्चिमेस अरबी समुद्राच्या दरम्यान वसलेला आहे. रायगड जिल्ह्याच्या पुर्वेला पुणे व सातारा जिल्हा, दक्षिणेस रत्नागिरी जिल्हा उत्तरेस मुंबई व ठाणे जिल्हा अशा प्रकारचे सापेक्ष स्थान लाभलेले असून निरपेक्ष स्थानाचा विचार करता रायगड जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १७°५१’ ते १९°०८’ उत्तर अक्षवृत्त तर रेखावृत्तीय विस्तार ७२°५१’ पूर्व ते ७३°४०’ पूर्व रेखावृत्त असा आहे. रायगड जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७१४८ चौरस कि.मी. असून रायगड जिल्ह्यास २४० कि.मी. किनारपट्टी लाभलेली आहे. तसेच किनारपट्टीवर उरणची खाडी, धरमतरची खाडी, रेवदंड्याची खाडी, बाणकोट खाडी, राजपुरीची खाडी अशा खाड्या उपलब्ध आहेत. रायगड जिल्ह्याचे प्राकृतिकदृष्ट्या खालाटी व वलाटी असे दोन विभाग पडतात. यापैकी खालाटी विभागाची उंची कमी असून तो समुद्रालगत सपाट मैदानाच्या स्वरुपात आहे. तर वलाटी विभाग सह्याद्री पर्वतरांगेला अनुसरून विस्तारलेला असून याची उंची जास्त आहे व अनियमित भूपृष्ठरचनेचा हा भाग आढळतो. रायगड जिल्ह्यास लाभलेल्या हवामानाचा विचार करता उष्ण दमट व सम हवामानाचा हा विभाग असून ऋतूपरत्वे या हवामानात थोडासा बदल होतो. येथील दैनिक व वार्षिक तापमान कक्षेत जास्त फरक आढळत नाही. रायगड जिल्ह्यातील पर्जन्याची सरासरी ही ३०० सेमी आढळते.

रायगड जिल्ह्याची सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ही २६,३४,२०० इतकी असून लोकसंख्येची घनता ही सरासरी ३६८ आढळते.

१.३ प्रादेशिक नियोजनाचा अर्थ संकल्पना, प्रकार व महत्त्व

प्रादेशिक नियोजनाचा अर्थ :

टेलर यांच्या मते, संपूर्ण पृथ्वीचा भूपृष्ठ हा एकच प्रदेश गृहीत धरुन त्यांनी प्रादेशिक नियोजनाचा अर्थ स्पष्ट केला आहे. यामध्ये पृथ्वी एक संपूर्ण प्रदेश (earth is whole region) असे समजले आहे.

प्रदेश म्हणजे इतर क्षेत्रापासून भिन्न असलेला समान गुणवैशिष्ट्यांचा समुच्चय असलेले क्षेत्र होय. असा टेलर यांनी प्रादेशिक नियोजनाचा अर्थ सांगीतलेला आहे. प्राकृतीक प्रदेश, राजकीय प्रदेश, वनस्पती प्रदेश, हवामान प्रदेश, जैविक प्रदेश असे रेनर यानी विविध प्रदेश सांगितले आहेत.

रिचार्ड हॉर्ट शॉर्न यांच्या मते प्रदेश म्हणजे असे क्षेत्र की, ते इतर प्रदेशापासून वेगळे असते परंतु त्यांची वैशिष्टये काही अंशी सीमेलगतच्या प्रदेशात संक्रमीत झालेली असतात. त्यांच्यात अस्पष्ट अशी सिमा रेषा असते. जे की आपणास दोन्ही प्रदेशात वैशिष्टयाची सरमिसळ झालेली पाहावयास मिळते. प्रदेशामध्ये प्रादेशिक जीवनाबरोबर आर्थिक जीवन सुद्धा समाविष्ट झालेले असते. आर्थीक व्यवसाय, प्राथमिक क्रिया, कृषी उदयोगधंदे इ. चा समावेश प्रदेशामध्ये होतो. आर.ई जेकोन्सन यांच्या मते बौध्दीक प्रकारचे आर्थिक जीवन आपणास मोठ्या प्रमाणावर पाहावयास मिळते.

प्रदेश सिमांकीत करत असताना प्रमुख प्रदेश आणि त्या प्रदेशात आदिवास करणारी लोकसंख्या यांच्या मध्ये समरुपता पाहावयास मिळते उदा. शारीरिक वैशिष्टये, पोशाख, राहाणीमान, खाण पाण्याच्या सवयी, यांच्यात समरुपता पहावयास मिळते. अशा प्रकारे प्रादेशिक नियोजन आखत असताना नियोजनाचा आराखडा तयार केला जातो आणि आवश्यक त्या सुविधा, अनुदान पूरविले जाते. त्यात प्रदेशाचा समतोल साधण्याचा प्रयत्न केला जातो.

१.४ प्रादेशिक नियोजनाच्या संकल्पना :

"विशीष्ट भौगोलिक प्रदेशात राहणाऱ्या जनसमुदायाच्या उन्नतीसाठी तेथील आर्थिक सामाजीक व भौगोलिक परिस्थीतीच्या संदर्भात नियोजन करण्याची संकल्पना विकसीत झाली असून प्रादेशिक विषमता कमी करण्याच्या हेतूने मुख्यतः मागास प्रदेशाच्या विकासार्थ विशिष्ट स्तरावर केलेले आर्थिक, सामाजिक, भौगोलिक नियोजन म्हणजेच प्रादेशिक नियोजन होय."

१.५ नियोजनाचे प्रमुख प्रकार :

१. बृहद नियोजन : (Large Planning)

२. मध्यम नियोजन : (Medium Planning)

३. लघू नियोजन : (Micro Planning)

१.६ प्रादेशिक नियोजनाचे महत्व :

प्रादेशिक नियोजनात सामाजिक विषमता दुर करण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबवल्या जातात. व्यक्तीचे राहणीमान, आर्थिक स्थिती व जीवनमान उंचावण्याकरिता प्रादेशिक नियोजन हे महत्वाचे आहे. प्रादेशिक नियोजनामधून कृषी क्षेत्रातील असमतोल दुर करण्यासाठी जलसिंचन सुविधा, नियमीत विजपुरवठा, विविध कृषी आवजारासाठी अनुदान देणे, अल्पदराने संकरित बि-बीयाने पुरविणे, रासायनिक खते, शेंद्रीय खते, शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावेल यातुन कृषी क्षेत्रात समतोल विकास साधता येईल.

प्रादेशिक नियोजनामुळे औदयोगिक विकास करण्यासाठी शासनाकडुन नवीन उदयोग निर्मीतीसाठी अत्यल्प दराने कर्ज पुरवठा केला जातो. ज्यामुळे बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होऊन त्यांच्या जीवनात स्थैर्य लाभेल. या सर्व गोष्टीसाठी प्रादेशिक नियोजन महत्वपूर्ण ठरते. गरिबी व श्रीमंती यातील दरी कमी करण्यासाठी गरीबासाठी वेगवेगळया शासकीय योजना राबविल्या व पुरविल्या जातात. ज्यामुळे प्रदेशा प्रदेशातील असमतोल कमी होऊन प्रादेशीक संतुलन राखले जाते.

प्रादेशिक नियोजनामुळे रोजगाराच्या वेगवेगळया संधी उपलब्ध होतात. रिकाम्या हाताना काम मिळाल्यामुळे समाजातील गुन्हेगारी, सामाजिक अस्वास्थ, सामाजिक असंतुलन या समस्या दुर होतात. तरुणांच्या शक्तीचा वापर राष्ट्राच्या विकासासाठी करुन घेण्यास प्रादेशिक नियोजन उपयुक्त ठरते. एकुणच गाव पातळी पासुन देश पातळीपर्यंत आपणास प्रादेशीक नियोजनाद्वारे कांही अशी संतुलन साधता येऊ शकते व यामुळे देशाच्या विकासासही हातभार लागतो. गावचा विकास हाच देशांचा विकास होय. शहरातील सुखासीन जीवनमानामुळे लागलेला सुखाचा लळा यामुळे खेडी ओस पडू लागली आहेत. शहरी जीवनाकडे लोक स्थलांतर करु लागले ज्यामुळे शहरे हे अनेक समस्यांचे आगार बनू लागले आहेत. मात्र खेड्यातल्या उपलब्ध साधन संपत्तीचा वापर करण्यासाठी प्रादेशिक नियोजन महत्त्वाचे आहे. विविध उदयोगधंदे व शेतीचा विकास शिवाय शहरी सेवा सुविधांचा स्वीकार खेड्यामध्ये केला गेला तर खेडे सुद्धा समृद्ध होऊ शकतात. म्हणूनच गांधीजीने खेड्याकडे चला असा उपदेश केला आहे.

१.७ पुर्व साहित्याचा आढावा :

१. **मिश्रा आर.पी. (१९६९)** यांनी त्यांच्या “प्रादेशिक नियोजन, तंत्रे, योजना आणि क्षेत्र अभ्यास” या त्यांच्या पुस्तकामध्ये प्रादेशिक नियोजनाच्या वेगवेगळ्या अनुषंगाने अभ्यास करुन उपयोजनाचे महत्व विशद केले आहे.

२. **गुहा बी. (१९९६)** यांनी ‘हुगळी’ जिल्हयातील सेवा केंद्राचा अभ्यास करत असताना आरोग्य केंद्रे, शाळा, पोस्ट ऑफीस, कृषी केंद्रे इ. घटकांचा विचार करुन सेवा केंद्राचे महत्व स्पष्ट केलेले आहे.

३. **मेहता अशोक (१९७०)** यांनी ‘भारतातील आर्थिक नियोजन’ हा अभ्यास करत असताना देश पातळीवरील कृषी, वाहतूक, दळणवळण, भूमी उपयोजन, जलसिंचन, उर्जा, लोकसंख्या, नागरीकरण मजूरक्षमता आणि सामाजिक घटक विचारात घेवून आर्थिक नियोजन स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

४. **गट एस.एल. (१९७६)** यांनी त्यांच्या ‘हरियाणा राज्यातील कर्नाल जिल्ह्यांचे सुक्ष्म नियोजन’ या पुस्तकांमध्ये सेवा केंद्राची केन्द्रीयता तसेच स्तर, रचना इ. घटकांचा अभ्यास केलेला आहे.

५. **चंद्र महेश आणि पुरी व्ही.के. (१९८३)** यांच्या ‘भारतातील प्रादेशिक नियोजन’ या पुस्तकामध्ये दिर्घ स्तरावरील नियोजन, बृहद, मध्यम व लघु स्तरावरील नियोजन या सर्वांचा अभ्यास करण्यासाठी सांख्यकिय तंत्राचा अवलंब केला आहे.

६. **भुपींदर झुत्शी (१९८७)** यांनी त्यांच्या “सेवा केंद्रे व त्यांचा सभोवतालच्या प्रदेशावरील प्रभाव काश्मीर खोऱ्यातील क्षेत्र अभ्यास” या संशोधन पत्रिकेमध्ये सेवा क्षेत्राचे वर्गीकरण करुन त्यांचे प्रशासकीय नियोजनावर होणारे परिणाम यांचा अभ्यास केलेला आहे.

७. **सिंग एस.सी. आणि राजीव कुमार (१९९२)** यांनी त्यांच्या “पश्चिम हिमालयातील ग्रामीण विकास एक भौगोलिक अभ्यास” या पुस्तकामध्ये नैसर्गिक व सामाजिक घटकांचे अभिक्षेत्रीय महत्व विशद करण्याचा प्रयत्न केला आहे.

८. **मुलानी ए . (२०१०)** यांनी त्यांच्या “सोलापूर जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक घटकांचे प्रादेशिक नियोजन” या शोधप्रबंधामध्ये जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक विकास विशद करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१.८ अभ्यासाची उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत संशोधन कार्य खालील उद्दिष्ट्ये समोर ठेवून करण्यात येणार आहे.

१) अभ्यास क्षेत्राच्या सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी आणि सुविधांचा अभ्यास करणे.

२) अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्या साधन संपत्तीचा अभ्यास करणे.

३) अभ्यास क्षेत्रातील सेवा केंद्राच्या अभिक्षेत्रीय वितरणाचा अभ्यास करणे.

४) अभ्यास क्षेत्रातील सेवा केंद्राची केंद्रीयता व श्रेणीचा अभ्यास करणे.

५) प्रादेशिक विकासात सेवा केंद्राचे योगदान अभ्यासणे.

६) सुक्ष्म प्रादेशिक नियोजनाच्या विकासाचा स्तर अभ्यासणे.

१.९ गृहितके :

सदरील शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी खालील गृहितके लक्षात घेतलेली आहेत.

१) रायगड जिल्ह्यातील सेवा केंद्रातील अंतर समान नसून त्यात असमानता आढळते.

२) उच्च दर्जाचे सेवा केंद्र हे उच्च दर्जाच्या सेवे बरोबरच कमी प्रतिच्या सेवाही पुरवितात.

३) जिल्ह्यात उपलब्ध असणाऱ्या एकूण सेवा केंद्रामध्ये खाजगी क्षेत्राचा वाटा फार मोठा आहे.

४) रायगड जिल्ह्यातील सेवा केंद्रात विविध प्रकारच्या सेवा सुविधांची कमतरता आहे.

५) सेवा केंद्रावर भौगोलिक घटकांचा प्रभाव आहे.

१.१० माहिती संकलन :

या संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या आकडेवारीचा आधार घेतला जाणार आहे. प्राथमिक स्वरुपाची माहिती शासकीय कार्यालये व निवडलेल्या गावांतील काही कुटूंब प्रमुखांना भेटी देवून प्रश्नावलीच्या माध्यमातून प्राप्त करण्यात येणार आहे. दुय्यम स्वरूपाची माहिती व आकडेवारी जिल्हा परिषदेचा वार्षिक अहवाल, विविध वर्षाचे सामाजिक व आर्थिक समालोचन, जनगणना पुस्तिका (इ.स.१९८१, १९९१, २००१ व २०११), जिल्हा गॅझेटियर, भूगोलाचे विविध संदर्भ ग्रंथ, नियोजनाशी संबंधित मासिके, प्रादेशिक नियोजनाबाबतचे ग्रंथ,

संशोधन लेख, महाराष्ट्र राज्य माहिती संचालनालयाचा अहवाल व इंटरनेटवरील विविध संकेतस्थळावरील माहितीचा आधार घेतला जाणार आहे.

१.११ अभ्यास पद्धती :

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी मिळवण्यात येणारी प्राथमिक व द्वितीयक माहितीचे विश्लेषण विविध तक्ते व आलेखाच्या साह्याने केले जाणार आहे. हे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकी पद्धती वापरली जाणार आहे. सेवा केंद्राचे वितरण दाखवण्यासाठी नकाशाशास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला जाईल.

सेवा केंद्राचे क्षेत्रफळ, वसाहती व लोकसंख्येनुसार असलेले वितरण अभ्यासण्यासाठी खालील सुत्राचा आधार घेतला आहे.

$$S.D. = \sqrt{\frac{\Sigma(x-\bar{x})^2}{N}}$$

अभ्यास क्षेत्रातील सेवा केंद्राचे वितरण कशा पद्धतीने झालेले आहे हे पाहण्यासाठी निअरेस्ट नेबर पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. यासाठी खालील सूत्र वापरलेले आहे.

सूत्र :

$$\text{RN} = \frac{\text{Observed Mean Distance}}{\text{Expected Mean Distance}}$$

$$0.5\sqrt{\frac{\text{A}}{\text{N}}}$$

खुलासा :

RN= Randomties

A = Total Area (एकूण क्षेत्र)

N = Total Number of Service Centers (एकूण सेवा केंद्र)

सेवा केंद्राचे प्रभावक्षेत्र अभ्यासण्यासाठी खालील पद्धतींचा वापर प्रस्तुत संशोधनात जाणार आहे. त्यात जॅक्सन यांची सुधारीत पद्धत व व्ही.एल.एस. प्रकाश राव यांची सुधारीत पद्धत यांचा वापर करण्यात येईल.

I) Jackson's Modified Method

सूत्र : 1) $(Influence\ area\ according\ to\ area = \frac{Total\ Area}{Total\ No.of\ Service\ Centres}$

2) $(Influence\ area\ according\ to\ villages = \frac{Total\ Villages}{Total\ No.of\ Service\ Centres}$

3) $(Influence\ area\ according\ to\ population = \frac{Total\ Population}{Total\ No.of\ Service\ Centres}$

II) V.L.S.Prakash Rao Method

सूत्र :

$$SI = \sqrt{\frac{A \times MP}{\pi \times RP}}$$

खुलासा :

SI = Sphere of Influence (प्रभाव क्षेत्र)

A = Area of the District (जिल्ह्याचे एकूण क्षेत्र)

MP= Population of the Villages served by the Service Centre (सेवा केंद्राच्या अंतर्गत येणाऱ्या वसाहतींची लोकसंख्या)

π = 3.14 (Constant Value)

RP= Total Rural Population (एकूण ग्रामीण लोकसंख्या)

१.१२ प्रकरण मांडणी :

प्रकरण पहिले - प्रस्तावना

- प्रस्तावना
- प्रादेशिक नियोजनाचे महत्त्व
- प्रादेशिक नियोजनाच्या पद्धती
- सामाजिक व आर्थिक विकास संकल्पना
- वस्ती श्रेणीची संकल्पना
- अभ्यास क्षेत्राची व विषयाची निवड
- उद्दिष्ट्ये

- आकडेवारी संकलन
- अभ्यास पद्धती
- पूर्व साहित्याचा आढावा

प्रकरण दुसरे - अभ्यास क्षेत्राची प्राकृतिक, सामाजिक व आर्थिक स्थिती

- स्थान
- भू-उठाव
- नदीप्रणाली
- हवामान
- मृदा
- नैसर्गिक वनस्पती
- भूमी उपयोजन
- कृषी
- जलसिंचन
- लोकसंख्या
- वाहतूक व दळणवळण
- उद्योगधंदे
- वसाहती (वस्त्या)

प्रकरण तिसरे - मानव संसाधन आणि सामाजिक व आर्थिक सुविधांचा विकास

- मानव संसाधन सुविधा
- आरोग्य सुविधा
- शैक्षणिक सुविधा
- जलसिंचन सुविधा
- कृषी सुविधा
- वाहतूक व दळणवळण सुविधा
- पोष्ट ऑफिस सुविधा
- बाजारकेंद्र सुविधा
- बँक सुविधा

प्रकरण चौथे - सेवा केंद्राची निवड आणि अभिक्षेत्रीय वितरण

- सेवा केंद्राची निवड
- सेवा केंद्राचे वितरण
- सेवा केंद्राच्या वितरणावर परिणाम करणारे घटक
- सेवा केंद्राच्या वितरणाचे प्रारूप

प्रकरण पाचवे - सेवा केंद्राची केंद्रीयता आणि श्रेणी

- केंद्रीयता संकल्पना
- केंद्रीयतेचे प्रादेशिक वितरण
- सेवा केंद्राची केंद्रीयता
- सेवा केंद्राच्या केंद्रीयता वितरणाचे प्रादेशिक प्रारूप
- सेवा केंद्राची श्रेणी
- सेवा केंद्राच्या श्रेणीचे प्रादेशिक वितरण
- सेवा केंद्राचे प्रभावक्षेत्र
- सेवा केंद्राच्या श्रेणी वितरणाचे प्रादेशिक प्रारूप

प्रकरण सहावे - सूक्ष्म प्रादेशिक नियोजनासाठी प्रादेशिक विकासाचे स्तर

- विकासाचे स्तर
- सामाजिक, आर्थिक विकास आणि सुविधांचे नियोजन
- सेवा केंद्राच्या प्रभावक्षेत्राचे नियोजन
- प्रादेशिक विकासात सेवाकेंद्राचे योगदान
- सेवा केंद्र श्रेणीचा ग्रोथ पोल (Growth Pole)
- नवीन सेवा केंद्र वस्त्यांची सुचना करणे.
- विकासासाठी प्रादेशिक नियोजन

प्रकरण सातवे - निष्कर्ष, शिफारशी व उपाययोजना

संदर्भ :

1. Bhat, L.S. (1976): Micro Level Planning : A Case Study of Karnal, Haryana, K.B. Publication, New Delhi.
2. Boudeville, J.R. (1966): Problems of Regional Economic Planning, Edinburgh University Press.

3. Chand Mahesh and Puri V.K. (1983): Regional Planning in India, Allied Publication, New Delhi.
4. Degaonkar, Chaya K. (1997): District Planning in India, Pointer Publishers, Jaipur (India).
5. Divakar, R.T. (1982): “Some Aspects of State Planning in India”, Yojana, Vol.26.
6. Glasson, J. (1974): An Introduction to Regional Planning, London, Hutchinson.
7. Khan, S.A. (1990): Growth Centres and Regional Planning : A Case Study of the Trans-Ghaghra Plain, Pointer Publishers, Jaipur.
8. Khan, Basheer Ahmed (1988): Regional Planning and Economic Development, Pointer Publisher, Jaipur (India)
9. Misra, G.K. and Kundu, A. (1980): Regional Planning at the Micro Level, Indian Institute of Publications, New Delhi.
10. Misra, R.P. (1969): Regional Planning – Concepts, Techniques, Policies and Case Studies, Concept Publication Company, New Delhi.
11. Mehta, Ashok (1970): “Economic Planning in India”, Young India, New Delhi.
12. Mulani (2010): ‘Regional Planning for Socio-Economic Development in Solapur District’, Unpublished Ph.D. Thesis, Solapur University, Solapur.
13. Prakashrao, V.L.S. (1969): The Theoretical Framework for Regional Planning, Concepts, Techniques, Policies and Case Studies (ed.), R.P. Misra, Mysore University Publication.
14. Sathe, M.D. (1973): Regional Planning an Areal Exercise, Saraswat Prakashan, Poona.
15. Sen, L.K. et.al., (1971): “Planning Rural Growth Centres for Integrated Area Development – A Cast Study”, NICD, Hyderabad.

संशोधक
बाबासाहेब मोहनराव कांबळे

मार्गदर्शक
डॉ.सदानंद हरिबा गोने
प्राचार्य, उज्वल ग्रामीण महाविद्यालय,
घोणसी ता.जळकोट जि.लातूर